उसासाठी ठिबक सिंचन सक्तीचे

शेतकऱ्यांना दोन टक्के व्याजाने कर्ज ; व्याजाचा भार साखर कारखान्यांवरही

विशेष प्रतिनिधी, मुंबई

येत्या दोन वर्षांत राज्यातील उसाखालील ३ लाख ५ हजार हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याचा निर्णय राज्य सरकारने मंगळवारी घेतला. सूक्ष्म सिंचनाच्या व्यवस्थेसाठी शेतकऱ्यांना दोन टक्के व्याज दराने प्रति हेक्टरी ८५ हजार ४०० रुपयांच्या मर्यादेत कर्ज देण्यात येणार असून साखर कारखान्यांवरही या कर्जाच्या व्याजाचा भार टाकण्यात आला आहे. मात्र सरकारचा हा निर्णय कंपन्यांच्या हिताचा असून आधी शेतकऱ्यांचे पूर्वीच्या योजनेचे पैसे द्यावेत अशी मागणी शेतकरी संघटनेचे खासदार राजू शेट्टी यांनी केली असून, याची सक्ती करता येणार नाही असे सांगत या निर्णयाला विरोध केला आहे.

ऊस हे बारमाही बागायती नगदी पीक असून उसाच्या पूर्ण वाढीच्या कालावधीत २५ हजार घनमीटर प्रति हेक्टर इतक्या पाण्याची आवश्यकता असते. ठिबक सिंचनाच्या वापराने प्रति हेक्टर सुमारे साडेसात हजार ते साडेबारा हजार घनमीटर पाणी बचत शक्य आहे. राज्यात ऊस पिकाखालील सर्वसाधारण क्षेत्र ९ लाख ४२ हजार हेक्टर इतके आहे. यापैकी सुमारे २ लाख २५ हजार हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आहे. अद्याप ७ लाख १८ हजार हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यास वाव असून हे सर्व क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आल्यास कमीत कमी पाण्याचा वापर करून तसेच खत, औषधे यांच्या खर्चात बचत होऊन उत्पादनात वाढ होऊ शकते. त्यामुळे राज्यातील टेंभू उपसा योजना, भिमा (उजनी), मुळा, निम्नमाना, हतनूर, उर्ध्वपूस, कान्होळी नाला (नागपूर) आणि आंबोली (सिंधुदुर्ग) या प्रकल्पांच्या लाभ क्षेत्रातील बारमाही पिकांना सिंचनासाठी ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा जून-२०१८ पर्यंत अवलंब करणे बंधनकारक करण्यात आले असून दोन वर्षांत तीन लाख पाच हजार हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यात येणार आहे. त्यानंतर टप्प्या टप्प्याने राज्यात सूक्ष्म सिंचन बंधनकारक करण्यात येणार आहे.

या योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रति हेक्टरी ८५ हजार ४०० रुपयांच्या मर्यादेत सवलतीच्या दराने शेतकऱ्यांना या कर्जाचे वाटप करण्यात येणार आहे. यासाठी नाबार्डकडून राज्य सहकारी शिखर बँकेला ५.५० टक्के दराने कर्ज देण्यात येणार असून राज्य बँक ६ टक्के दराने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला कर्ज देईल, तर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका शेतकऱ्यांना ७.२५ टक्के दराने कर्ज देणार आहे. या योजनेत शेतकऱ्यांच्या कर्जावरील वार्षिक व्याज ७.२५ टक्के असेल. मात्र शेतकऱ्यांना केवळ दोन टक्के तर राज्य सरकार चार टक्के व्याजाचा भार उचलणार असून साखर कारखान्यांना सव्वा टक्के व्याजाचा भार उचलावा लागणार आहे. ऊस पिकाखालील क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याची योजना ही सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांसाठी बंधनकारक करण्यात आली आहे.

ठिबक सिंचनाला प्रोत्साहन देण्याकरिता कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या सस्टेनेबल ॲग्रो-कमर्शियल फायनान्स लिमिटेड (सफल) या कंपनीच्या संचालकांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. सरकारने हे अतिशय सकारात्मक व योग्य पाऊल उचलले आहे. उसाच्या पिकाचे संवर्धन व वाढ करतानाच पाण्याचा कमीत कमी आणि योग्य वापर ठिबक सिंचनामुळे शक्य आहे अशा शब्दांत सफलचे संचालक अरविंद सोनमळे यांनी सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. तर खासदार राजू शेट्टी यांनी मात्र सरकारच्या या निर्णयाची तुघलकी निर्णय अशी संभावना केली आहे. ठिबक सिंचन योजनेस आपला विरोध नाही, त्यामुळे पाण्याची बचत होते आणि उत्पादनही वाढते मात्र त्यासाठी लागणारी भांडवली गुंतवणूक करण्याची शेतकऱ्यांची ताकद नाही. यापूर्वी ठिबक सिंचन योजना राबविणाऱ्या शेतकऱ्यांना अद्याप पैसे मिळालेले नसून ते आधी द्यावे अशी मागणीही शेट्टी यांनी केली.

पणन महासंघाच्या अध्यक्षपदी उषा शिंदे

खास प्रतिनिधी, नागपूर

राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या येवला येथील उषा शिंदे यांची निवड करण्यात आली. मंगळवारी नागपुरात झालेल्या निवडणुकीत बुलढाण्याचे प्रसन्नजीत पाटील (काँग्रेस) यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.

राज्यातील युतीच्या सत्ताकाळात काँग्रेस-राष्ट्रवादीकडे आलेले हे ऐकमेव सत्तापद होय. एकूण १७ संचालकांपैकी ९ राष्ट्रवादीकडे तर ८ काँग्रेसकडे होते. सत्तावाटपाच्या सूत्रानुसार अध्यक्षपद राष्ट्रवादीकडे तर उपाध्यक्षपद काँग्रेसकडे देण्याचा निर्णय दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी घेतला.

पणन महासंघाच्या पहिल्या महिला अध्यक्ष झालेल्या उषा शिंदे या येवला बाजार समितीच्या दोन वेळा सभापती होत्या, २५ वर्षे नगरसेवक आणि पाच वर्षे नगराध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम सांभाळले. पणन महासंघाच्या त्या सलग तीन कालावधीसाठी संचालक आहेत.

राज ठाकरे यांना दिलासा

मोर्चाप्रकरणी दाखल केलेला गुन्हा रद्द

प्रतिनिधी, मुंबई

आझाद मैदान येथे २०१२ मध्ये झालेल्या दंगलीच्या विरोधात परवानगी नाकारली गेल्यानंतरही निषेध मोर्चा काढल्याप्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि त्यांच्या पक्ष कार्यकर्त्यांवर नोंदवण्यात आलेला गुन्हा मंगळवारी उच्च न्यायालयाने रद्द केला.

आझाद मैदान येथे झालेल्या दंगलीच्या निषेधार्थ राज ठाकरे यांनी २१ ऑगस्ट २०१२ रोजी गिरगाव चौपाटी ते आझाद मैदान असा निषेध मोर्चा काढला होता. या मोर्चाला परवानगी नाकारली जाऊनही त्यांनी हा मोर्चा काढला होता. त्यामुळे पोलिसांनी राज ठाकरे आणि त्यांच्या पक्ष कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यात पक्षाचे सचिव शिरीष सावंत यांचाही समावेश होता. सावंत यांनी २०१५ मध्ये उच्च न्यायालयात धाव घेत दाखल गुन्हा रद्द करण्याची मागणी केली होती.

न्यायमूर्ती रणजित मोरे आणि न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी सुनावणी झाली. त्या वेळी ज्या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्यानुसार गुन्हा दाखल केल्यानंतर सहा महिन्यांत आरोपपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. मात्र अद्याप आरोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही, असा युक्तिवाद सावंत यांच्या वतीने ॲड. राजेंद्र शिरोडकर यांनी केला. तसेच या आधारे गुन्हा दाखल करण्याची विनंती केली. न्यायालयानेही त्यांचा हा युक्तिवाद मान्य करत राज ठाकरे, सावंत आणि अन्य पक्ष कार्यकर्त्यांवर दाखल गुन्हा रद्द केला. राज ठाकरे यांनी स्वतः या प्रकरणी याचिका केली नव्हती, परंतु न्यायालयाने संपूर्ण प्रकरण निकाली काढल्याने त्यांच्यावरील गुन्हाही रद्द झाला आहे, असे शिरोडकर यांनी सांगितले.

दंगलीवर बोलू न दिल्याने मायावतींचा राजीनामा

राज्यसभेत बोलण्यास परवानगी मिळत नसल्याने मंगळवारी बसप प्रमुख मायावती संतप्त होत्या.

(पान १ वरून) आणि गदारोळातच भाषण सुरू केले. त्यांना दिलेला तीन मिनिटांचा वेळ संपताच उपाध्यक्ष प्रा. पी.जे. कुरियन यांनी त्यांना रोखले आणि वेळ संपल्याची जाणीव करून दिली. पण मायावतींच्या तोफा दणाणत होत्या. मोदी सरकार गोरगरीब आणि दलितांवर अत्याचार करीत असल्याचा त्यांचा घणाघात चालू होता. तेव्हा कुरियन यांनी तीव्र शब्दांत त्यांना सुनावले. सभागृहाचा वेळ सर्वांसाठी आहे. तुम्ही त्याच्यावर कब्जा करू शकत नाही, असे ते म्हणाल्यानंतर मायावती एकदम भडकल्या आणि म्हणाल्या, दलितांवरील अत्याचारांबाबत मला जर सरकार बोलू देत नसेल, माझे कुणी ऐकून घेत नसेल तर मला राज्यसभेत राहण्याचा नैतिक अधिकार नाही. मला बोलू द्या, नाही तर मी राजीनामाच देईन. त्यांच्या धमकीनंतरही गोंधळ चालू राहिला. सभागृहाचा अवमान केल्याचा दावा करून मायावतींच्या माफीची मागणी सत्तारूढ खासदार करीत होते. दुसरीकडे काँग्रेसचे गुलाम नबी आझादांनी दलित, मुस्लिमांचे हत्याकांड करण्यासाठी भाजपला जनादेश मिळाला नसल्याची आक्रमक शेरेबाजी केली. योगी आदित्यनाथांच्या राजवटीत मुस्लीम व दलित दहशतीखाली असल्याचा दावा विरोधक करीत होते. त्यानंतर सभागृह ठप्प झाले.

संतप्त झालेल्या मायावतींनी दुपारी उपराष्ट्रपती व राज्यसभेचे अध्यक्ष डॉ. हमीद अन्सारी यांच्याकडे आपला राजीनामा सादर केला. बोलू न दिल्याच्या निषेधार्थ राजीनामा देत असल्याचे नमूद केले. रात्री उशिरापर्यंत तरी त्यांचा राजीनामा स्वीकारलेला नव्हता. कदाचित तांत्रिक कारणावरून तो फेटाळण्याची शक्यता आहे. खासदारकीचा राजीनामा पत्रात कारण नमूद न करण्याचा नियम आहे. तसेच ते अतिशय मोजक्या शब्दांत लिहिण्याचे बंधन असते. पण मायावतींनी कारणही दिले आहे आणि पत्रही सविस्तर लिहिलेले आहे.

राजीनाम्यामागचे राजकारण

मायावतींची राज्यसभेतील मुदत एप्रिल २०१८ मध्ये संपते आहे. मात्र, उत्तर प्रदेशातून त्यांना स्वबळावर निवडून येणे कठीण आहे. त्यांच्याकडे फक्त १९ आमदार असून राज्यसभा गाठण्यासाठी किमान ५० मतांची आवश्यकता आहे. लागोपाठच्या दोन निवडणुकांमधून निसटता दलित जनाधार यांच्यामुळे मायावती चिंतित आहेत. त्यांचे बहुतेक नेते भाजपच्या मार्गावर आहेत. अशा स्थितीत जनाधार टिकविण्यासाठी त्यांनी राजीनाम्याचे नाट्य खेळल्याचे मानले जात आहे. मायावतींना बिहारमधून राज्यसभेवर पाठविण्याची तयारी लालूप्रसाद यादव यांनी दाखविली आहे.

खूनप्रकरणी अल्पवयीन आरोपीचा जामीन फेटाळला

प्रतिनिधी, मुंबई

सपना शुक्ला खून प्रकरणातील अल्पवयीन आरोपीला जामीन देण्यास विशेष सत्र न्यायालयाने मंगळवारी नकार दिला. 'सपना' ही लोकलमधून प्रवास करीत असताना कुर्ला स्थानकादरम्यान तिच्या गळ्यातील सोनसाखळी चोरल्यानंतर या आरोपीने तिला गाडीतून खेचले होते. त्यामुळे समोरून येणाऱ्या गाडीखाली येऊन तिचा मृत्यू झाला होता. गुन्ह्याचे स्वरूप लक्षात घेऊन न्यायालयाने त्याचा जामीन फेटाळून लावला.

या अल्पवयीन आरोपीचे वय १७ वर्षे आणि काही महिने आहेत. त्यानंतरही बाल न्याय मंडळाने त्याच्यावरील प्रकरण बाल न्यायालयात न चालवता सत्र न्यायालयात पाठवले होते. त्याने केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप फार गंभीर असल्यानेच त्याच्यावर सज्ञान म्हणून खटला चालवण्यात यावा, असे नमूद करीत मंडळाने प्रकरण सत्र न्यायालयात वर्ग केले होते. त्याच्यावर सज्ञान म्हणून खटला चालवावा की नाही याचा फेरविचार सत्र न्यायालयाकडून करण्यात येत असून त्याचा निर्णय प्रलंबित आहे. त्याचदरम्यान या आरोपीने जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र न्यायालयाने त्याची जामिनावर सुटका करण्यास नकार दिला.

मूळचा ओरिसा येथील असलेला हा आरोपी विज्ञान शाखेतून बारावी करीत होता.

चार सनदी अधिकाऱ्यांची बदली

प्रतिनिधी, मुंबई

राज्य शासनाने मंगळवारी शाम गोयल, अमिताभ घोष, राजेश कुमार, जे. पी. गुप्ता या चार सनदी अधिकाऱ्यांची बदली केली.

शाम गोयल यांची नेमणूक आता पाणी पुरवठा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून, घोष यांची बदली महसूल व वन विभागाचे प्रधान सचिव व विशेष कार्य अधिकारी म्हणून करण्यात आली. तर राजेशकुमार आता कामगार, उद्योग, उर्जा विभागाचे प्रधान सचिव म्हणून तर गुप्ता हे राज्य मानवाधिकार आयोगाचे सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

SBI

आमच्या खालील शाखांचे स्थलांतर

आमच्या खालील शाखांचे 24.07.2017 पासून अधिक सोयिस्कर व प्रशस्त जागेत स्थलांतर होत असल्याचे घोषित करतांना आनंद होत आहे.

स्थलांतरित होणारी शाखा			स्थलांतरित झालेल्या शाखांचे तपशील		
	शाखेचा कोड	शाखेचे नाव	स्थलांतरित शाखेचे नाव/नवीन शाखेचा पत्ता	नवीन शाखेचा कोड	टेलीफोन क्रमांक
1	30002	एंपायर हाऊस शाखा	कमर्शियल शाखा 235/237, पेनिनशुला हाऊस, खादी भंडार शेजारी, डी. एन. रोड, मुंबई-400001.	31279	22630627 22630628
2	20001	कमर्शियल शाखा, मित्तल टॉवर, नरिमन पॉइंट	एसएमई बॅंकबे रिकलेमेशन शाखा, मित्तल कॉर्ट, बी विंग, तळ मजला, नरिमन पॉइंट, मुंबई-400001.	11688	टेली. 22024391 फॅक्स.22023508
3	20679	ओव्हरसीज शाखा कुलाबा	नरिमन पॉइंट शाखा, दलामल हाऊस, स्टेट्स हॉटेल शेजारी, नरिमन पॉइंट, मुंबई-400021.	6945	मो. 8008044820 मो. 9869534289 टेली. 40777402
4	70666	कमर्शियल शाखा, तुलसीयानी चेंबर	एसएमई बॅंकबे रिकलेमेशन शाखा, मित्तल कॉर्ट, बी विंग, तळ मजला, नरिमन पॉइंट, मुंबई-400001.	11688	टेली. 22024391 फॅक्स.22023508
5	32604	मेकर चेंबर शाखा	नरिमन पॉइंट शाखा, दलामल हाऊस, स्टेट्स हॉटेल शेजारी, नरिमन पॉइंट, मुंबई-400021.	6945	मो. 8008044820 मो. 9869534289 टेली. 40777402
6	16228	विशेष वैयक्तिकृत बँकिंग शाखा चेंबूर	के-स्टार मॉल शाखा, तळ मजला सायन, ट्रॉम्बे रोड, चेंबूर, मुंबई-400071.	40245	मो. 7045664403 मो. 9920588203 टेली. 25214460

स्थळ : मुंबई
दिनांक : 18/07/2017

उपमहाव्यवस्थापक
दक्षिण मुंबई (विभाग)

टाटा इन्व्हेस्टमेण्ट कॉर्पोरेशन लिमिटेड

एल्फिन्स्टन बिल्डिंग, १०, वीर नरिमन रोड, मुंबई ४०० ००१. दूर. ९१ २२ ६६६५८२८२
फॅक्स ९१ २२ ६६६५७९१७
सीआयएन:एल ६७२००
एमएच१९३७पीएलसी००२६२२
ई-मेल : ticl@tata.com
संकेतस्थळ : www.tatainvestment.com

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेण्ट्स) नियमावली २०१५ च्या २९ सह वाचल्या जाणाऱ्या नियमावली ४७ च्या अनुषंगाने याद्वारे **सूचना** देण्यात येते की, ३० जून २०१७ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित एकमेव वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसोबत विचारात घेऊन संमत करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवार, **१ ऑगस्ट २०१७** रोजी मुंबई येथे होणार आहे.

उपरोक्त तपशील कंपनीच्या (www.tatainvestment.com) तसेच एनएसई (www.nseindia.com) आणि बीएसई (www.bseindia.com) या संकेतस्थळांवर पाहता येईल.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे
टाटा इन्व्हेस्टमेण्ट कॉर्पोरेशन लिमिटेड
मनोज कुमार सीव्ही
मुख्य वित्तीय अधिकारी व कंपनी सचिव
मुंबई, १९ जुलै २०१७

TATA

ADLABS Entertainment Limited

Registered Office: 30/31, Sangdewadi, Khopoli-Pali Road, Taluka Khalapur, District Raigad 410 203, Maharashtra, India.
Corporate Office: 9th Floor, Lotus Business Park, New Link Road, Andheri (West), Mumbai 400 053, Maharashtra, India.
CIN: L92490MH2010PLC199925, **Tel:** +91 22 4068 0000; **Fax:** +91 22 4068 0088
Email: compliance@adlabsentertainment.com **Website:** www.adlabsimagica.com

NOTICE

Pursuant to Regulation 47 read with Regulations 29 and 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Wednesday, July 26, 2017, *inter alia*, to consider and approve unaudited financial results of the Company for the quarter ended June 30, 2017.

The said notice is also available on the Company's website at www.adlabsimagica.com and may also be accessed on the Stock Exchange websites at www.bseindia.com and www.nseindia.com.

For **Adlabs Entertainment Limited**
Madhulika Rawat
Company Secretary

Place : Mumbai
Date : July 18, 2017

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.
(केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त प्रकल्प)
पुणे मेट्रो रेल प्रकल्प
१०१, दी ओरियन, डॉन बास्को युथ सेंटर समोर, कोरेगाव पार्क, पुणे ४११००१. दूरध्वनी : ०२०-२६०५१०७२
ई-मेल : mahametro.tendersgmail.com | www.punemetrorail.org

निविदा सूचना क्र. P1C-04/2017 दिनांक 19.07.2017

कामाचे स्वरूप : पुणे मेट्रो रेल प्रकल्पाच्या कॉरिडॉर-२ (ई-डब्ल्यू कॉरिडॉर) मधील स्थानक भागातील (व्हायाडक्ट सोडून) वनाज, आनंदनगर, आयडीयल कॉलनी, नळ स्टॉप, गरवारे कॉलेज, डेक्कन, संभाजी उद्यान व पुणे मनपा अशा ८ (आठ) एलेव्हेटेड मेट्रो रेल स्थानकांचे बांधकाम.
काम पूर्ण करण्याचा कालावधी : ११० (एकशे दहा) आठवडे
निविदा प्रपत्रांची किंमत : रु. १,००,०००/- (रुपये एक लाख मात्र)
बयाणा रक्कम: रु. २.३० कोटी (रुपये दोन कोटी तीस लाख मात्र)
इच्छुक निविदाकारांनी पुणे मेट्रो रेलच्या www.punemetrorail.org या संकेतस्थळाला भेट द्यावी अथवा दि. १९.०७.२०१७ रोजी १६:०० पासून https://mahametrorail.etenders.in या आमच्या ई-टेंडर पोर्टलवरून निविदा प्रपत्रे डाउनलोड करून घ्यावी आणि निविदेविषयीची अधिक माहिती घ्यावी.

महाव्यवस्थापक (निविदा)
महा-मेट्रो

महा मेट्रो, हरित मेट्रो

सी डैक CDAC

Centre for Development of Advanced Computing, Mumbai invites applications for the post of Legal Consultant. The details regarding the post & how to apply are available at our website: **www.cdac.in**. Interested candidates may send their applications in prescribed format to the **Manager (HRD), Centre for Development of Advanced Computing, Gulmohar Cross Road No. 9, Juhu, Mumbai 400049** by **August 8, 2017**
Advt No.
(CDACM/01/2017).

SBTC राज्य रक्त संक्रमण परिषद महाराष्ट्र राज्य
रविंद्र अनेक्स, ५वा मजला, दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट रिक्लेमेशन, मुंबई-४०००२०
टेलि : २२८३०२१६ फॅक्स : २२८५४९८१ E-Mail: sbtc@mahasbtc.com

जाहिरात क्र.२/२०१७

थेटमुलाखत

राज्य रक्त संक्रमण परिषद जी एक स्वायत्त आणि नोंदणीकृत विश्वस्तसंस्था आहे ती राज्य रक्त संक्रमण परिषद कार्यालय करिता कंत्राटी स्वरुपात खालील पदा करिता थेट मुलाखत घेवू इच्छिते.

राज्य समन्वय अधिकारी (१)

शैक्षणिक अर्हता : एम.डी (पॅथॉलॉजी)/ ट्रान्सफयुजन मेडिसीन) / किंवा एम.बी.बी.एस. नंतर शरीर विकृतीशास्त्र (पॅथॉलॉजी) विषयातील पदवीका (डि.सी.पी.)किंवा रक्तसंक्रमण विषयातील पदवीका (डि.टी.एम.) / किंवा एम.बी.बी.एस. व हॉस्पीटल व्यवस्थापन /प्रशासना मधील पदवी / पदविका.
अनुभव : २ ते ३ वर्षाचा अनुभव त्यापैकी रक्तपेढीतील कामकाजाचा एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच शासकिय नियम व अन्न व औषध प्रशासनाच्या परवाना प्राप्ती नियमांचे ज्ञान असणे आवश्यक. सेवा निवृत्त व्यक्तीस प्राधान्य देण्यात येईल.
वय : मुलाखतीच्या दिवशी वय ६२ वर्षापेक्षा जास्त असू नये.
ठोक वेतन : रुपये ५०,०००/- (प्रति माह)
(शासन निर्णय क्र. संकिर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३ दिनांक ०८ जानेवारी, २०१६ नुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास वेतनाची मासिक मर्यादा रु. ४०,०००/- इतकी (रु. चाळीस हजार फक्त) इतकी असेल. व यामध्ये नमुद केल्याप्रमाणे इतर अटी व शर्ती लागू राहतील.
टीप :-
१) उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान व मराठी बोलणे आवश्यक आहे.
२) मुलाखतीचा दिनांक २९.०७.२०१७ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ४:०० वा
मुलाखतीसाठीचा पत्ता : सर जे.जे. महानगर रक्तपेढी, तळ मजला, एफ.डी.पेटीट इमारत, जे.जे. कॅम्पस, जे.जे.रोड, जे.जे.मार्ग पोलिस स्टेशन रोड जवळ, भायखळा, मुंबई-४०० ००८
३) उमेदवाराने मुलाखतीसाठी येताना त्याचा बायोडेटा व मुळप्रमाणपत्रे घेऊन यावीत.

सही/-
संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद

IRB INFRASTRUCTURE DEVELOPERS LTD

Regd. Office: Wing-A, 2nd Floor, Office No.201, Universal Business Park, Chandivali Farm Road, Off Saki Vihar Road, Mumbai - 400 072
Tel. No. (022) 6733 6400 • **Fax No.** (022) 6733 6440
Website: www.irb.co.in • **e-mail:** grievances@irb.co.in
CIN: L65910MH1998PLC115967

NOTICE

Notice is hereby given that the Meeting of the Board of Directors of the Company will be held on Monday, July 24, 2017 at Mumbai to consider and take on record, among other things, the Unaudited Financial Results of the Company for the quarter ended June 30, 2017and to consider declaration of interim dividend, if any, for the financial year 2017-18.

The record date for the purpose of this interim dividend, if declared, is August 1, 2017.

The intimation is also available on the website of BSE Limited **(www.bseindia.com)** and National Stock Exchange of India Limited **(www.nseindia.com)** where the Company's shares are listed and on the website of the Company viz. **www.irb.co.in**

For **IRB Infrastructure Developers Ltd.**

Sd/-
(Mehul Patel)
Company Secretary

Dated : July 18, 2017
Place : Mumbai.

फेर ई-निविदा सूचना

कार्यालयाचे नाव - जव्हार नगर परिषद, जव्हार, जि. पालघर

स्थानिक आमदार निधी अंतर्गत विकासकामांसाठी फेर ई-निविदा सूचना सन २०१७-२०१८

मुख्याधिकारी, जव्हार नगर परिषद, जव्हार, जि. पालघर खालील कामांकरिता शासनाने सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील **विद्युत विभाग**, यांचे नोंदणी प्रमाणपत्र असलेले नोंदणीकृत ठेकेरांकडून ई-निविदा मागवित आहेत.

कामाचे संक्षिप्त वर्णन

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित रक्कम रुपये	बयाणा रक्कम रोख स्वरुपात रुपये	सुरक्षा अनामत		निविदा फॉर्म फी	ठेकेदार नोंदणी वर्ग	काम करणेची मुदत	निविदेचे नाव
				करारनामा सोबत (३%)	बिलातून (७%)				
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
५	जव्हार नगर परिषद हद्दीत प्रभाग क्र. १ ते ४ मध्ये महत्त्वाच्या ठिकाणाच्या विद्युत पोलवर एल.ई.डी. पथदिवे बसविणे.	४,४४,६०९/-	५,०००/-	१३,३३८/-	३१,१२३/-	१०००/-	वर्ग-९ व त्यावरील	२ महिने	स्थानिक आमदार निधी

निविदा प्रक्रियेची तारीख व वेळ

अ.क्र.	निविदा प्रक्रियेचे स्वरुप	दिनांक	वेळ
१	ऑनलाईन टेंडर प्रसिद्धी	१९.०७.२०१७	सायंकाळी ५.०० वा.
२	ऑनलाईन निविदा डाऊनलोड करणेचा सुरुवात कालावधी	१९.०७.२०१७	सायंकाळी ५.०० वा.
३	ऑनलाईन निविदा भरणेचा सुरुवात कालावधी	१९.०७.२०१७	सायंकाळी ५.०० वा.
४	ऑनलाईन निविदा भरणेचा समाप्ती कालावधी	२९.०७.२०१७	सायंकाळी ५.०० वा.
५	ऑनलाईन निविदा उघडणेचा टेक्निकल (पार्ट) कालावधी	३१.०७.२०१७	सायंकाळी ५.०० वा.
६	ऑनलाईन निविदा उघडणेचा वाणिज्य (पार्ट) कालावधी	०१.०८.२०१७	सकाळी ११.०० वा.

१. निविदा कागदपत्रांचा तपशील http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२. निविदाकारांनी त्यांच्या बोली ऑनलाईन पद्धतीने सादर कराव्यात.
३. निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी वरीलप्रमाणे नोंदणी वर्गवारीनुसार व त्यावरील डिजीटल सिग्नेचर आणि वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर यूजर आयडी व पासवर्ड नोंदणी असणे आवश्यक आहे.
४. कोणत्याही स्पष्टिकरणाकरिता ०२५२०-२२२४३६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
५. कोणत्याही कारणाशिवाय निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, जव्हार नगर परिषद जव्हार, जि. पालघर यांनी राखून ठेवला आहे.
६. निधीच्या उपलब्धतेनुसार कामाचे कार्यादेश व देयक देण्यात येतील.
७. **निविदाकारांनी निविदा फी व इसारा रक्कम ही ऑनलाईन भरणे आवश्यक असल्याने निविदाकाराला निविदा फी व इसारा रक्कम भारतीय स्टेट बँकेच्या नेट बँकिंग पद्धतीने भरणे आवश्यक आहे.**
८. **निविदेसोबत निविदाधारकांनी मक्तेदाराचे नोंदणीप्रमाणपत्र, आयकर व पॅनकार्ड प्रमाणपत्र,** टेंडर फॉर्ममधील सत्य प्रतिज्ञालेख **Affidavit रु. १००/- च्या स्टॅम्प** पेपरवर **(मा. कार्यकारी दंडाधिकारी/नोटरी करणे आवश्यक) इ. कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.**
९. एल.ई.डी. बसविणेचे काम सा. बां. विभाग यांचे विनिर्देशप्रमाणे करणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील **विद्युत विभाग**, यांचे नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.
१०. **अंदाजपत्रकीय रक्कमेचे कमी दराचे बोलीकरिता परफॉर्मर्स सिक्युरिटी डिपॉझिट सार्व. बांधकाम विभागाचे अटी शर्तीनुसार तंतोतंत लागू असेल तसेच अटी व शर्तींचा भंग होणाऱ्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.**
११. जव्हार नगर परिषद निविदा समितीस अटी/शर्तीमध्ये कोणत्याही वेळेस बदल करण्याचा संपूर्ण हक्क/अधिकार राहील व ज्याप्रमाणे बदल करतील तो निविदाधारकांवर बंधनकारक राहील.
१२. सदर एल.ई.डी.बाबत २ वर्षे मुदतीची विनामोबदला रिप्लेसमेंट नगर परिषदेस करून देणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.
१३. सदर एल.ई.डी. हे बजाज, हेवल्स, फिलिप्स यांचे किंवा यांसारख्या नामांकित कंपनीचे व सी.ई.सर्टीफाईड कंपनीचे असणे बंधनकारक राहील.

जा.क्र. दिवाबत्ती ई-निविदा/कावि-९९७/२०१७
जव्हार नगर परिषद कार्यालय जव्हार,
जि. पालघर.

दिनांक १८.०७.२०१७

सही/-
(श्री. संदिप रविंद्र वैद्य)
अध्यक्ष
जव्हार नगर परिषद जव्हार

सही/-
(डॉ. वैभव कैलास विधाते)
मुख्याधिकारी
जव्हार नगर परिषद जव्हार